# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akola.nic.in


---

**क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि-552/2020** **दिनांक: 16/07/2020**

---

वाचा – 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा – 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष2/प्रस/गृह/कावि-336/2020 दिनांक 21.05.2020
5. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष2/प्रस/गृह/कावि-549/2020 दिनांक 15.07.2020

**शुक्रवार दिनांक 17 जूलै 2020 चे सायं. 7.00 पासून ते मंगळवार दिनांक 21 जूलै 2020 चे सकाळी 7.00 वाजेपर्यंत लॉकडाऊन.**

## सुधारीत आदेश

**ज्या अर्थी,** महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई यांचे दि. 13 मार्च 2020 चे अधिसुचनेन्वये राज्यात कोरोना विषाणुमुळे (कोव्हिड 19) उद्भवणा-या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे व या विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपत्कालीन उपायोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 ची अंमलबजावणी अधिसुचनेच्या दिनांकापासुन सुरु करण्यांत आली आहे.त्या अनुषंगाने अकोला जिल्हयामध्ये तसेच राज्यामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्यामुळे आपतकालिन योजना करणे गरजेचे असल्यामुळे जिल्हाधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. **आणि**

**ज्याअर्थी,** संदर्भीय आदेश क्र. ५ मध्ये **"सदर आदेश दिनांक 17 जूलै 2020 चे सायंकाळी 7.00 वा. पासून दिनांक 20 जूलै 2020 चे मध्यरात्री 00.00 वा. पर्यंत संपूर्ण अकोला जिल्हयाकरिता लागू राहील."** असे नमूद करण्यात आले आहे.

**त्याअर्थी,** सदर आदेशामध्ये अंशत:बदल करण्यात आला असून " **सदर आदेश शुक्रवार दिनांक 17 जूलै 2020 चे सायं. 7.00 पासून ते मंगळवार दिनांक 21 जूलै 2020 चे सकाळी 7.00 वाजेपर्यंत संपूर्ण अकोला जिल्हयाकरिता लॉकडाऊन लागू राहील"** असे वाचावे.

o/c

**(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)**
**जिल्हादंडाधिकारी, अकोला**

**प्रतिलीपी:-**

1. **मा. विभागीय आयुक्त,** *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. **जिल्हा पोलीस अधिक्षक,** अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
3. **आयुक्त, महानगर पालिका** अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
4. **उपविभागीय अधिकारी** ---------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
5. **तहसिलदार** ------------------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
6. **प्रकल्प अधिकारी,** नगर पालिका प्रशासन अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी उपरोक्त आदेशानुसार संबंधीत मुख्याधिकारी यांना आपलेस्तरावरुन सूचित करावे.
7. **व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय,**नागपुर यांना माहिती करीता तथा शासकिय राजपत्रात वरील आदेशाची प्रसिध्द करुंन 5 प्रती या कार्यालयास सादर करण्यात यावा.
8. **जिल्हा माहिती अधिकारी,** अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

o/c

**जिल्हादंडाधिकारी, अकोला**

NitinK.Covid-19odrdr.doc